# प्रकरण ६वे

# उपसंहार

LIBRARY

## प्रकरण 6 वे

## उपसंहार

प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासामध्ये,संस्कृतीमध्ये वाङमयाला अनन्यसाधारण महत्त्व असते. वाङमयामध्ये त्या त्या राष्ट्राच्या उदात्त परंपरांचे प्रतिबिंबच उमटलेले दिसून येते. समाजप्रबोधन,जनजागरण घडवून आणण्यात वाङमयाचा सिंहाचा वाटा असतो.समाज सुधारणा घडविण्यास साहित्य समर्थ असते. समाजामध्ये मातृभूमी,मातृभाषा यांच्याविषयी आत्मीयता,राष्ट्रीय परंपरा-संस्कृतीविषयी अभिमान,स्वराष्ट्र-रक्षणाची भावना,राष्ट्रोध्दाराची आस,आपल्या देशवासीयांबद्दल बंधुभाव आणि ऐक्यभावना वृध्दिंगत करण्याच्या कामी वाङमयाचा खूपच उपयोग होत असतो. प्रत्येक राष्ट्राचा प्राचीन इतिहास सांगणारी एखादी प्राचीन भाषा असते. आम्हा भारतीयांची अत्यंत प्राचीन,समृध्द अशी संस्कृत भाषा आणि या भाषेतील अफाट साहित्यसागर अनेक वाङमयीन रत्नांनी परिपूर्ण ॠग्वेद हे या साहित्यरत्नाकरातील पहिले रत्न होय. संस्कृत साहित्याचा संपूर्ण अभ्यास करावयाचा म्हणजे एका जन्मात अशक्य गोष्ट आहे. त्यामुळे या अफाट ज्ञानसागरातील एखादा बिंदू चाखता आला तर पाहावा या विचाराने "महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील राष्ट्रीय विचार प्रवाह असलेल्या संस्कृत काव्यांचा विवेचक अभ्यास" करण्याचा विचार करून हा लघुशोधनिबंध लेखनाचा प्रपंच मांडला.

विविध भाषा,विविध प्रांत,विविध धर्म-पंथ अशा वैविध्याने नटलेल्या या भारतामध्ये सर्वत्र समान असणारी गोष्ट म्हणजे संस्कृत भाषा ! प्रत्येक प्रांतामध्ये संस्कृतप्रेमी,संस्कृत-अभ्यासक,संस्कृत विद्वान कवी होऊन गेले,आहेत आणि पुढेही होत राहतील. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायानुसार कवींच्या स्वाभावधर्मानुसार विविध प्रकारची काव्ये निर्माण होतात. नऊ रसांनी परिपूर्ण वाङमयामध्ये मात्र सर्वत्र वीररस दिमाखाने वावरताना दिसतो. मातृभूमीविषयीची भक्तिभावना,मायभूमी-विषयीची अमाप प्रीती,निष्ठा,शूरवीरांच्या शौर्याचे गाईलेले पोवाडे,राष्ट्राच्या परंपरांचा,संस्कृतीचा वर्णिलेला अभिमान,राष्ट्रीय एकात्मतेची,राष्ट्रोत्कर्षाची प्रत्येक कवीच्या मनातील तळमळ सर्वत्र सारखीच दिसून येते. राष्ट्रगौरवाचे गान गाण्यात कोण कोणापेक्षा वरचढ आहे हे ठरविणे अवघडच आहे. प्रत्येकाची राष्ट्रनिष्ठा त्याच्या त्याच्या परीने श्रेष्ठच असते. महाराष्ट्रातील संस्कृत साहित्यिकही इतर सर्व प्रांतीय साहित्यिकां-प्रमाणे राष्ट्रनिष्ठ आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील कवींच्या साहित्यामधून प्रकट होणा-या राष्ट्रीय विचारांचा अभ्यास करीत असतानाच त्याला अनुषंगून सहज साध्य होणारी गोष्ट म्हणजे "संस्कृत ही मृत भाषा नाही," ही होय.

राष्ट्रनिष्ठेचा विचार करावयाचा म्हणजे प्रथम राष्ट्र म्हणजे काय ? राष्ट्रनिष्ठा कशाला म्हणतात ? राष्ट्रवाद या संकल्पनेचा अर्थ काय? यांचा विचार विविध संस्कृत,मराठी व परदेशी

विद्वानांच्यामताचा आधार घेऊन प्रस्तावनेत केला आहे. पूर्व परंपरा, संस्कृती, मातृभूमी व मातृभाषा यांच्या अभिमानाने एकरूप व सुसंघटित झालेल्या समाजालाच " राष्ट्र" म्हणणे उचित ठरते. संघटित समाजच "राष्ट्र" या पदवीला पोचू शकतो. देश, वंश, धर्म, संस्कृती व भाषा हे राष्ट्राचे मुख्य पाच घटक एकतेने बध्द असतात. आणि या सर्वांविषयी म्हणजे स्वत:च्या देश, धर्म, संस्कृती, भाषा यांच्याविषयी वाटणारी आत्मीयता, प्रेम, अभिमान यालाच राष्ट्रनिष्ठा म्हणावयाचे स्वत:च्या देशातील भूमी, नद्या, पर्वत, समुद्र, वनराई, देवदेवता, धर्म, तत्त्वज्ञान, कला, पूज्य, विभूती, थोर देशभक्त, राज्ये, समाज, ऐक्य या सर्वांचे वर्णन करणारे जे साहित्य असेल; स्वदेशाभिमान व्यक्त करणारे जे साहित्य असेल त्याला राष्ट्रवादी साहित्य म्हणावयाचे.

"राष्ट्रीय विचारसरणी आमच्यामध्ये पाश्चात्यांच्या अनुकरणातून आली आहे" हा जो कांही लोकांच्या चुकीचा ग्रह आहे. तो पुसुन टाकण्याचा प्रयत्न पहिल्या प्रकरणांत केलेला आहे. ऋग्वेदकाळापासून ते स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंतच्या एकंदरच संस्कृत साहित्यामधून व्यक्त होणाऱ्या राष्ट्रीय विचारांचा धावता आढावा या प्रकरणांत घेतला आहे. अगदी जगातील आद्य वाङ्मय जे ऋग्वेद त्यामध्येदेखील विचार व्यक्त झालेले दिसून येतात. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चारही वेदांमध्ये तत्कालीन ऋषीकवींची राष्ट्रनिष्ठा दृष्टोत्पत्तीस येते.

वेदामध्ये जन्मभूमीला माता म्हटले आहे. आपल्या देशभूमीला मातेची उपमा देवून वैदिक ऋषी त्या भूमीविषयीचे आपले प्रेम, आपली श्रध्दा आणि आदर व्यक्त करतात. ज्याप्रमाणे एखादा सुपुत्र आपल्या मातेची अवहेलना, विपन्नावस्था कधीही पाहू शकत नाहीत्याप्रमाणे भूमातेची दुर्दशा, देशाची विपन्नावस्था देशपुत्रही सहन करू शकणार नाही. मातेच्या उन्नतीसाठी, गौरवरक्षणासाठी तो सदैव प्रयत्न" शील राहील. असे वाटल्यानेच या ऋषींनी जन्मभूमीला माता म्हटले असावे. आणखी एक दुसरे कारण म्हणजे देशाला माता म्हटल्याने येथील सर्व रहिवासी एकाच मातेचे पुत्र म्हणजे बांधव आहेत ही बंधुभावाची भावना लोकांच्यामध्ये निर्माण करण्याचा हा एक प्रयत्न असावा.

भारतीयाचे " राष्ट्रगीत " आहे की नाही याविषयी विव्दांनामध्ये मतभेद आहेत. " भारतीयांच्यात एक राष्ट्र" ही भावना कधी नव्हतीच. त्यांना राष्ट्रवाद किंवा राष्ट्रनिष्टा ही संकल्पना माहीत झाली ती ब्रिटीशांच्या संपर्कामुळेच" असे म्हणाऱ्या विव्दानांनी गप्प करता येईल. असा भक्कम पुरावा अथर्ववेदात आहे. अगदी वैदिक काळी सुध्दा " एक राष्ट्र" ही कल्पना आम्हा भारतीयांच्यात होती. आमचे प्राचीन राष्ट्रगीतही आहे. अथर्ववेदाच्या बाराव्या कांडातील पहिले सूक्त हे "मातृभमीचे वैदिक राष्ट्रगीत" आहे. या राष्ट्रगीताच्या अभ्यासावरुन आमचे प्राचीन संस्कृत साहित्य प्रखर

राष्ट्रीय भावना जागृत करणारे आहे, हे सिध्द होते. वैदिक राष्ट्रगीतातून राष्ट्रोध्दारासाठी लोकांमध्ये आवश्यक गुण कोणते असावेत हे सांगितले आहे. राष्ट्राच्या उध्दारासाठी, उन्नतीसाठी लोकांच्यामध्ये सत्य, सरलता, उग्रता, दक्षता, तप, ज्ञान आणि यज्ञ या गुणांची आवश्यकता असते. या गुणांचा अभाव असलेले राष्ट्र स्वत:चे स्वातंत्र्य गमावते. राष्ट्रोध्दारासाठी ऐक्य, संघटन यांची गरजही वैदिक राष्ट्रगीतातून व्यक्त केली आहे.

राष्ट्र जिच्यामुळे टिकून राहते ती राष्ट्रीशक्ती होय. तिच्यामुळे राष्ट्राचा उध्दार, उत्कर्ष आणि रक्षण होते. ही राष्ट्री शक्ती समाजातीलचारी वर्णातील लोकांच्यामध्ये निर्माण होते तेव्हाच राष्ट्राचा उत्कर्ष होतो.

वेदामध्ये केवळ राष्ट्रीय भावनांचाच विचार आलेला नाही तर आंतरराष्ट्रीय कल्याणाची भावना देखील व्यक्त होते. स्वराष्ट्र कल्याणाबरोबरच विश्वकल्याणाची आकांक्षा देखील जाणवते. आज जगातले कोणतेही राष्ट्र अन्य राष्ट्रांशी निरपेक्षपणे राहू शकत नाही. स्वराष्ट्राच्या प्रगतीसाठी, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी दुस-या राष्ट्रांच्या सहकार्याची, सहानभूतीची गरज लागतेच. आणि त्यासाठी आंतरराष्ट्रीय सलोखा, सामंजस्य व विश्वबंधुत्वाच्या भावनेची गरज आहेच. स्वत: जगा आणि दुस-यांनाही जगू द्या. स्वाभिमानाच्या रक्षणाबरोबरच स्वाभीमानरक्षणातही सहकार्य करा. स्वराष्ट्राभिमानाबरोबरच दुस-यांच्या राष्ट्राभिमानाची कदर करायला शिकावे." हे आमचे प्राचीन संस्कृत साहित्य आम्हाला शिकविते. आंतरराष्ट्रीय भावनेची जपणूक आमच्या संस्कृत साहित्यिकांनी केलेली आहे – आमचे संस्कृत साहित्यिक स्वत:च्या राष्ट्राचे रक्षण करण्याचा संदेश देतात पण दुस-या राष्ट्रावर विनाकारण आक्रमण करण्याचा सल्ला कधीच देत नाहीत. आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी सांगतात मात्र इतरांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा बदसल्ला देत नाहीत. यावरून संस्कृत साहित्याची आंतरराष्ट्रीय भावनाही व्यक्त होते.

पुराणांमधूनही भारतीय संस्कृती आणि परंपरेचे उत्कृष्ट दर्शन घडते. भारतवर्षाचा गौरवपूर्ण इतिहास आपल्याला पुराणात पहावयास मिळतो.

भारतवर्षाचे हिमालयापासून दक्षिणसमुद्रापर्यंतचे वर्णन चित्रित केलेले दिसते. पुराणकारांनी भारतवर्षाला विश्वातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र म्हटले आहे. विश्वामध्ये केवळ भारतच कर्मभूमी आहे. तेथे देवता देखील जन्म घेण्यास उत्सुक असतात. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारी पुरूषार्थांची प्राप्ती करून देणारा भारत देश असे म्हटले आहे. संपूर्ण राष्ट्राच्या कल्याणाची कामना व्यक्त केली आहे. भारतभूचे देवदेवतांचे, राष्ट्रनायकांचे स्तवन आणि संस्कृती व परंपरांच्या साभिमान वर्णनातून

पुराणकारांनी भारतीयांच्या मनात मातृभूमीविषयीचा अभिमान, गौरवशाली परंपराविषयी आदर निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

रामायण महाभारत हे दोन ग्रंथ तर राष्ट्रनिष्ठेची, आदर्शाची उत्तम उदाहरणे आहेत. व्यास, वाल्मीकींनी कृष्ण व रामाच्या रूपाने आदर्श राष्ट्रनायकाचे चित्र साकार केले आहे. भारत आणि भारतीयता याविषयी लोकांच्या मनात आस्था वाढविण्याच्या दृष्टीने महाभारत अत्यंत उपयुक्त आहे. संपूर्ण भारताचा भौगोलिक आणि सांस्कृतिक परिचय देऊन व्यासांनी भारतीयांच्या मनात एकता आणि स्वदेशाभिमान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

भास, कालिदास, विशाखदत्त, अश्वघोष, बाण, भारवी, श्रीहर्ष, बिल्हण, नीळकंठ, वगैरे कवींनी आपले राष्ट्र, आपली संस्कृती आणि परंपरा यांचे सुंदर चित्रण आपल्या साहित्यामधून केले आहे. आपल्या मातृभूमीविषयी त्यांच्या मनात असणारी श्रध्दा, स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वातंत्र्य रक्षणाची त्यांची तळमळ; येथील गौरवशाली परंपरेविषयी वाटणारा अभिमान त्यांच्या साहित्यात जागोजागी व्यक्त होताना दिसतो. बहुतेक सर्वच रूपकांच्या भरतवाक्यामधून राष्ट्रकल्याणाची भावना व्यक्त होते.

एकंदरीत ऋग्वेदकाळापासून स्वातंत्र्यपूर्वकाळापर्यंत होऊन गेलेल्या कवींच्या काव्या- मधून मातृभूमीविषयीचे प्रेम, देवदेवता-राष्ट्रनायक - पूज्यविभूतींविषयीची श्रध्दा, सादर अभिमान, स्वराष्ट्र- रक्षणाची, राष्ट्रोन्नतीची आकांक्षा, पराधीनतेविषयी तिरस्कार व स्वातंत्र्याचा केलेला पुरस्कार प्रकर्षाने प्रकट होतो. यांची भारतीय जनतेच्या मनात निश्चितच राष्ट्रचैतन्य निर्माण होण्यास मदत झाली आहे, होत आहे व पुढेही या साहित्याच्या अनुशीलनाने लोकांच्या मनात राष्ट्रचैतन्य संचारेल याची खात्री वाटते. ज्या ज्या वेळी भारतावर संकटे आली त्या त्या वेळी अशा राष्ट्रनिष्ठ साहित्यापासून प्रेरित झालेल्या लोकांनी राष्ट्राचे रक्षण केले आहे.

दुस-या प्रकरणांत छ. शिवराय, लोकमान्य टिळक, विवेकानंद, महात्मा गांधी, सुभाष बाबू, सावरकर, नेहरू यांच्यासारख्या राष्ट्रनायकांच्या चरित्रपर काव्यामधून तसेच ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास या संत पुरूषांच्या चरित्रपर काव्यामधून व्यक्त होणा-या स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील कवींच्या राष्ट्रीय विचारांचा मागोवा घेतला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील राष्ट्रीयविचारांनी भारावलेले असे अनेक कवी महाराष्ट्रात होऊन गेले. आणि अजूनही आहेत की ज्यांच्या काव्यातून त्यांच्या राष्ट्रीय भावना प्रकर्षाने जाणवतात. स्वातंत्र्योत्तर काळातील संस्कृत साहित्याचा आत्माच राष्ट्रनिष्ठा आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही. कारण या काळातील बहुतांश साहित्य केवळ स्वातंत्र्य चळवळी, स्वातंत्र्य सेनानी यांच्या गौरवगाथांनी परिपूर्ण आहे. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यिकांमध्ये पंडिता क्षमा राव, श्रीनिवास ताडपत्रीकर, विश्वनाथ छत्रे, डॉ. श्री. भा. वर्णेकर, श्री. श्री. भि. वेलणकर, पंडित

वासुदेवशास्त्री बागेवाडीकर,श्री.कृ.वा.चितळे, ग.बा.पळसुले हे त्यांच्या प्रखर राष्ट्रनिष्ठेमुळे आणि अलौकिक अशा संस्कृत प्रेमामुळे प्रसिध्द आहेत.

मोगलांच्या गुलामगिरीतून आपल्या राष्ट्राला मुक्त करुन हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना नायक बनवून त्यांच्यावर अनेक कवींनी महाकाव्ये, रुपके लिहिली त्यामध्ये डॉ.श्री.भा.वर्णेकरांचे " श्रीशिवराज्योदयम् " हे महाकाव्य, "शिवराजाभिषेकम्" हे नाटक, "अध्यात्मशिवायनम्" ही पोथी,श्री.श्री.भि.वेलणकरांचे "छत्रपतिः श्रीशिवराजः" आणि "कल्याणकोषः" आणि श्री.श्री.वि.बोकील यांचे "शिववैभवम्" हे नाटक, यांचा समावेश प्रामुख्याने करता येतो.

श्री.डॉ.वर्णेकरांच्या मनात शिवरायांबद्दल नितांत आदर आहे.अपार,श्रध्दा आहे.शिव-रायांच्या चरित्राचे गान गाण्यासाठी त्यांनी एक महाकाव्य,एक नाटक आणि एक पौराणिक शैलीमध्ये पोथीसारखे काव्य लिहिले आहे. शिवरायांच्या राष्ट्रप्रेमाने, स्वराज्य निर्मितीच्या व राष्ट्रोत्कर्षाच्या ध्येयाने श्री.वर्णेकर प्रभावित झाले आहेत. त्यांच्या या सर्वच साहित्यामधून शिवरायांविषयीची त्यांची निष्ठा प्रकट होते. "श्रीशिवराज्योदयम" या 68 सर्गांच्या महाकाव्यात श्री. वर्णेकरांनी शिवरायांच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंतच्या घटनांचे वर्णन केले आहे. मूठभर मावळयांच्या साहाय्याने एवढया मोठया मुघल साम्राज्याशी टक्कर घेणारा स्वराज्यांची स्वप्ने साकार करणारा, राष्ट्रोपासक शिवाजी आणि त्याच्या शब्दाखातर स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणारे मावळे अखिल भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रचैतन्य निर्माण करणारे आहेत.या पद्य काव्यामध्ये पारतंत्र्यांची निंदा आणि स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले आहे. स्वदेशभक्ती हीच ईश्वरपूजा मानून स्वतंत्रता ही कुलदेवता मानली आहे. राष्ट्र-सेवेचे व्रत अंगिकारिलेल्या व्यक्ती कशा असाव्यात त्यांचे केलेले गुणवर्णन आजच्या राष्ट्रनायकांना देखील आचरणीय आहे. "शिवराजाभिषेकम् " या सात अंकी नाटकात शिवरायांच्या राज्यभिषेकाचे सांगोपांग वर्णन केले आहे. डॉ.वर्णेकरांनी शिवरायांच्या चरित्राची तुलना रामायणाशी करुन जणू शिवरायांना रामाची योग्यता दिली आहे. छायानाटकातील स्वराज्यप्रतिज्ञेच्या प्रसंगी शंकरात मंदिरात सर्व मावळयांनी केलेली प्रार्थना स्फूर्तिदायक आहे. राष्ट्रचैतन्य निर्माण करणारी आहे. राजमाता जिजाऊंनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीरांचे स्मरण करुन,त्यांना मानवंदना देण्यासाठी म्हटलेले गीत कवीच्या मनातील स्वातंत्र्ययोध्दयांविषयीचा आदर प्रकट करते.सातव्या अंकातील स्वतंत्र भारताचे वर्णन कवीच्या स्वतंत्र भारताविषयीच्या भावना व्यक्त करतात. "अध्यात्मशिवायनम्:" या पौराणिक शैलीमध्ये लिहिलेल्या प्रवचनात्मक काव्यामध्ये स्वामी विवेकानंद आणि लोकमान्य टिळक यांच्यातील संवादातून भारतराष्ट्राच्या उध्दारक,परमदेशभक्त वीरशिरोमणी छ.शिवाजीमहारांच्या लोकोत्तर,ऊर्जस्वल

कार्याचा संक्षिप्त परंतु मर्मस्पर्शी आढावा घेतला आहे आणि त्याव्दारे भारतीयांच्या अर्धमूर्च्छित राष्ट्रीयभावनेला चैतन्य प्राप्त करून दिले आहे.भारतीयांच्यात जागृती निर्माण करण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न आहे. लोकांच्या मनामध्ये राष्ट्रहिताची भावना उद्दीपित करण्याचा वर्णकरांचा हा प्रयत्न निश्चितच स्तु . आहे.

श्री.श्री.भि.वेलणकर यांनी देखील शिवाजी महाराजांच्या जीवनावर दोन नाटके लिहून त्यांच्या विषयीच्या आपली श्रध्दा,निष्ठा,प्रकट केली आहे. "छत्रपतिः श्रीशिवराजः" या पाच अंकी संगीत नाटकातून कवीच्या राष्ट्रनिष्ठ मनाची साक्ष पटते. जेजुरी येथे शिवराय आणि शहाजी यांच्या भेटीचे हृद्य वर्णन कवीने केले आहे. स्वराज्याचे आपले स्वप्न साकार करणा-या पुत्रावरील प्रेमाचे त्याच्या पराक्रमाचा अभिमान असणा-या शहाजीचे आगळे दर्शन लेखकाने घडविले आहे. या नाटकाचे आणखी एक वैशिष्ठय म्हणजे यामध्ये कवीने समर्थांच्या कवनांच्या संस्कृतानुवादाचा जनजागरणासाठी चातुर्याने करून घेतलेला उपयोग ! प्रस्तावनेत मातृदेवतेची केलेली स्तुती,स्वतंत्रता देवीला केलेली मानवंदना पाहता कवीची मातृभूमीवरील नितांत निष्ठा व्यक्त होते शिवरायांची स्तुती,स्वतंत्रता देवीला केलेली मानवंदना पाहता कवीची मातृभूमीवरील नितांत निष्ठा व्यक्त होते. शिवरायांची स्तुती करणारी, वाचकांच्या मनात जोम, आवेश निर्माण करणारी,ओजस्वी मराठीतील पोवाडयांचे स्मरण करून देतात " जे लोक राष्ट्रहितामध्ये मग्न असतात. त्यांचे जीवन धन्य असते. राष्ट्रहितार्थ मृत्युला कवटाळून आपल्या यशाने जणू ते मृत्युला जिंकतात" हा विचार राष्ट्रहितार्थ आत्मार्पण करण्यास प्रेरक आहे. नाटकाच्या अखेरीस आलेल्या शिवरायांच्या स्वगत भाषणातून श्री.वेलणकरांची राष्ट्रनिष्ठा व्यक्त होते. मातृभूमीची सेवा करण्याचे जे आपण व्रत अंगिकारीले आहे. त्याची सदैव जाणीव असावी. धर्म,जात, वर्ण कोणताही भेद या ध्येयपूर्तीच्या आड येवू नये. अशी इच्छा व्यक्त केली आहे. आजही अशा ध्येयनिष्ठेची,ध्येयाने झपाटणा-या अनेक शिवबांची राष्ट्राला गरज आहे. ही ध्येयनिष्ठा,राष्ट्रनिष्ठा, मातृभूमी विषयीचे प्रेम लोकांच्या मनात जागृत करणे हा उदात्त हेतू या नाटयलेखनामागे असावा असे दिसते. याशिवाय "कल्याणकोषः" या नाटकामध्ये "कल्याणची लूट" या घटनेवर आधारीत कथानक आहे. यामध्ये शिवरायांच्या साहसी कार्याचे वर्णन केले आहे. आपल्या राष्ट्राचे रक्षण हेच परमसाध्य आहे. संधी मिळताच शत्रूचा नाश केला पाहिजे. आपल्या देशाच्या शत्रूची शक्ती वाढू देवू नये. तसेच आपल्या देशाची शक्ती कमी होऊ देवू नये. कारण शत्रूची वाढलेली शक्ती आमच्यासाठी संकट बनते आणि आपली वाढलेली शक्ती प्रयोजन सिध्द करते. हा महत्त्वपूर्ण विचार कवीने या नाटकातून मांडला आहे.

श्री वि.पां.बोकील यांनी "श्रीशिववैभवम्" या पाच अंकी नाटकात शिवरायांच्या पराक्रमा-बरोबरच त्यांच्या पाठीशी असलेल्या संतांच्या आशीर्वादाचे महत्त्व वर्णिले आहे. राष्ट्रोध्दारासाठी, समाजोन्नतीसाठी वीरपुरूषांचा सिध्दजनांशी झालेला संगम कसा हितावह ठरतो त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे क्षात्रतेजयुक्त शिवराय आणि ब्राह्मतेजयुक्त रामदास यांचा मिलाफ होय. ज्ञान आणि शौर्य यांचा सुरेख संयोग राष्ट्रकार्यार्थ मोठाच साहाय्यक ठरला. यामध्ये चंद्रराव मो-यांच्या कन्येचे शौर्याभिमानी वर्तन स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि धाडस वृध्दिंगत करणारे आहे. स्त्री ही अबला नाही. स्वधर्म-संरक्षण, चारित्र्यरक्षण करताना आपल्या सामर्थ्याचा स्त्रीने उपयोग केला पाहिजे. परकीयांच्या आक्रमणास प्रत्युत्तर देण्यास स्त्रियांनी देखील सज्ज झाले पाहिजे. असा संदेश श्री बोकील आपल्या नाटकातून देतात.

शिवरायांनंतर लो.टिळकांच्या जीवनावरील काव्यामधून जे राष्ट्रीय विचार प्रकटतात त्यांचा अभ्यास केलेला आहे. लोकमान्यांच्या जीवनावर श्री माधव हरी अणे, श्री वेलणकर, श्री कृ.वा.चितळे, पं.वासुदेवशास्त्री बागेवाडीकर यांनी काव्ये लिहिली आहेत. "स्वराज्याच्या हक्काची" सर्वसामान्य लोकांमध्ये जाणीव निर्माण करणारे टिळक राष्ट्राभिमानाचे ज्वलंत प्रतीक आहेत. कै.श्री. अणे यांनी "श्रीतिलकयशोऽर्णवः" नावाचे 85 तरंगात 10712 पद्ये असलेले महाकाव्य लिहिले आहे. हे महाकाव्य म्हणजे टिळकांच्या अजरामर जीवनाचा यशोसागर आहे. भारत राष्ट्रावर प्रेम करणा-या, त्याच्या योगक्षेमाची चिंता करणा-या देशभक्ताविषयी या महाकाव्यात कवीने असीम श्रध्दा, अपार आदर आणि स्नेह व्यक्त केलेला आहे. या सर्वांना कवीने भक्तिभावाने प्रणाम केला आहे. कवीची भारतीय संस्कृतीविषयीची निष्ठा व्यक्त होते. पारतंत्र्याविषयी कवीने तीव्र खेद व्यक्त केला आहे. पारतंत्र्य-रोगातून देशाची सुटका करायची असेल तर "ऐक्य"हेच एकमेव औषध आहे. हा विचार या काव्यात प्रकट केला आहे. "स्वराज्य ही देवता आणि देशभक्ती ही तिची उपासना" अशी कवीची धारणा आहे. भारतभूमीवर भाग्यलक्ष्मीचा निवास सदैव रहावा अशी सदिच्छा कवीने व्यक्त केली आहे.

"श्रीलोकमान्यस्मृतिः" या तीन अंकी नाटकात श्री वेलणकरांनी विभिन्न पात्रांच्या माध्यमातून स्वतंत्रता संग्रामाचे अमर सेनानी, परमदेशभक्त, लोकमान्य टिळक यांच्याविषयी श्रध्दा प्रकट केली आहे. टिळकांची अदम्य राष्ट्रभक्ती, लोकप्रियता, लोकमान्यता यांचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण केलेले आहे. तिस-या अंकात भारतदेश व भारतीय संस्कृतीवर प्रकाश टाकलेला आहे. त्यावरून वेलणकरांच्या भारतीय संस्कृतीविषयीच्या अभिमानाच्या भावना व्यक्त होतात. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी खूप मोठे बलिदान देणे गरजेचे असते. करूण विलापांनी स्वातंत्र्यप्राप्ती होत नाही तर त्यासाठी मौल्यवान प्राणांची आहुती दयावी लागते. म्हणून दुबळेपणा झटकून शौर्याचा अंगीकार करण्याचा उपदेश टिळकांनी लोकांना केला.

या टिळकांच्या उपदेशातून वेलणकरांचे स्वातंत्र्यविषयक विचार प्रकट होतात. टिळकांच्या माध्यमातून वेलणकरांनी स्वतःचे राष्ट्रप्रेम व्यक्त केले आहे.

श्री.कृ.वा.चितळे, यांनी "लोकमान्यटिळकचरितम्" या गद्यपद्यग्रंथाची रचना 18 पर्वांमध्ये केली आहे. यामध्ये टिळकांच्या संपूर्ण जीवनाचे चित्रण केले आहे. एवढेच नव्हे तर शेवटच्या समालोचन पर्वात तौलनिक दृष्टीने गुणदोषांची चर्चा करुन टिळकांचे विभूतिमत्त्व आणि त्याचा भारतराष्ट्रावर झालेला सुपरिणाम यांचे वर्णन केले आहे. प्रज्ञावंत, देशभक्त, कर्मयोगी टिळकांचे हे चरित्र वाचकांच्या मनात दोन प्रकारच्या निष्ठा निर्माण करणारे आहे. पहिली निष्ठा म्हणजे भारतराष्ट्र एक आहे. ते स्वतंत्र करणे किंवा राखणे हे आपले कर्तव्य आहे. सर्व भारतीयांच्या मनात निर्माण होणारी ही एकात्म भारताविषयी स्वराष्ट्रनिष्ठा तर दुसरी निष्ठा चिरंतन धार्मिक तत्त्वदर्शनावर आधारित कर्मयोगनिष्ठा । या दोन निष्ठांच्या बाबतीत टिळकांचे चरित्र आदर्श आहे. भारतातील सर्वच सुपुत्रांचे स्मरण करून कवीने त्यांच्याविषयीचे ऋण की ज्याचे भारतीयांनी सतत कृतज्ञतेने स्मरण ठेवून त्या ऋणातून उतराई होण्यासाठी स्वराष्ट्रसेवाच केली पाहिजे, असे ऋण सांगितले आहे. या पुस्तकातील पानापानातून टिळकांविषयीची निष्ठा तर व्यक्त होतेच शिवाय कवीची राष्ट्रनिष्ठाही प्रत्ययास येते.

"श्रीतिलकचरितम्"नावाचे श्री वासुदेवशास्त्री बागेवाडीकरांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी छोटेसे गद्यचरित्र लिहिले आहे. अत्यंत सोप्या भाषेत टिळकांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचे वर्णन बागेवाडीकरांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी विभूतिपूजन करावे, त्यांच्या मनात स्वदेशप्रेम, राष्ट्रनिष्ठा निर्माण व्हावी, राष्ट्रीय चैतन्याने त्यांनी प्रेरित व्हावे या हेतूने श्री बागेवाडीकरांनी या पुस्तकाची रचना केली आहे. या पुस्तकातून श्री बागेवाडीकरांच्या मनात टिळकांविषयी असलेली श्रध्दा प्रकट होते.

डॉ श्री.भा.वर्णेकरांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर "विवेकानन्दविजयम्" नावाचे दहा अंकी नाटक लिहिले आहे. विवेकानन्दांनी भारताचे माहात्म्य जगविख्यात केले. विश्वधर्मपरिषदेमध्ये विवेकानंदांनी सनातन धर्माचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करून भारताची विश्वकल्याणाची सदिच्छा व्यक्त केली. विवेकानंदांच्या या भाषणातून त्यांचे अगाध देशप्रेम, अपार धर्मनिष्ठा प्रकट होते. त्यांच्या शब्दा-शब्दातून स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान प्रकट होतो. राष्ट्राच्या विपन्नावस्थेमुळे नायकाच्या मनात निर्माण झालेल्या व्याकुळतेचे हृदयस्पर्शी वर्णन वर्णेकरांनी केले आहे. दीर्घकाळ पारतंत्र्यात बध्द असलेल्या भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि उध्दारासाठी अशा दैदिप्यमान, तेजस्वी, शूरवीर सन्यांशांची आवश्यकता कवीने व्यक्त केली आहे. या नाटकातून वर्णेकरांची विवेकानंदांवरची दृढ भक्ती, भारत व

भारतीय सनातन धर्माविषयीची श्रध्दा प्रकट होते. विवेकानंदांविषयी कवीच्या मनात असणारा अपरंपार अभिमान प्रत्ययास येतो. वर्णेकरांनी विवेकानंदांना "विश्वाच्या रंगमंचावरील दैदिप्यमान तारा" म्हटले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे मूर्तिमंत राष्ट्रभक्ती, आदर्श वाक्पटुत्व, ध्येयवादाचे उत्तुंग शिखर, दिव्याचरणाचा मानदंड, स्वधर्म संरक्षक, भारताचे भाग्यच जणू ! अशा या राष्ट्रवादी थोर पुरूषाला चरित्रनायक बनवून डॉ. ग. बा. पळसुले यांनी "धन्यो ऽ हं धन्यो ऽ हं" हे चार अंकी नाटक तर त्यांच्या शौर्यगाथेचे संकीर्तन करणारे "विनायक वीरगाथा" हे गद्यकाव्य लिहिले आहे. "धन्यो ऽ हं धन्यो ऽ हं" या नाटकाची रचना डॉ. पळसुले यांनी स्वातंत्र्यासाठी सावरकरांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या राष्ट्रवादाची, धर्मप्रियतेची थोरवी गाण्यासाठी तसेच सावरकरांविषयीची स्वनिष्ठा प्रकट करण्यासाठी केलेली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले यातच स्वतःला धन्य मानणाऱ्या सावरकरांच्या जीवनाची "इति कर्तव्यता" झाली असे वाटून त्यांच्याच तोंडी शेवटच्या अंकातील भरतवाक्य स्वरूपात आलेल्या उद्‌गारांचेच नाव नाटकाला देण्यात कवीचे औचित्य दिसून येते. "विनायकवीरगाथा" या गद्यग्रंथात कवीची राष्ट्रीयभावना आणि सावरकरांवरील निष्ठा पदोपदी जाणवते. भारतभूमीविषयी प्रामाणिक राहण्याच्या आकांक्षेने कवीने भारतभूमीला माता म्हटले आहे. या मातेच्या कुशीतच सदैव राहण्याची इच्छा प्रकट केली आहे. जे शरीर देशाच्या उपयोगी पडत नाही त्या शरीराचा जन्म व्यर्थ अशी कवीची भावना आहे. या गाथेत श्री. पळसुले यांनी सावरकरकृत साहित्यांचा केलेला उल्लेख आदरणीय आहे. कारण सावरकरांच्या साहित्यातून राष्ट्रवाद ओसंडून वाहतो. त्यांच्या साहित्यात त्यांची देशभक्ती, स्वातंत्र्याची तळमळ अभिव्यक्त झालेली आहे. या गाथेत राष्ट्राच्या स्वातंत्र्याविषयीची आस ठायी ठायी व्यक्त होते. येथे स्वतंत्रतेचे मानवीकरण केलेले आहे. आपल्या राष्ट्रगौरवाच्या विरूध्द जाणारे, देशप्रेमविरहित असे लोक, मग ते कितीही मान्यवर का असेनात तिरस्करणीयच आहेत, हा विचार या काव्यात दिसतो. सावरकरांच्या श्रध्दाळू, विभूतिपूजक, मातृभूनिष्ठ व्यक्तिमत्वाच्या वर्णनातून कवीच्या राष्ट्रीयभावना, पूज्य विभूतिंविषयीच्या श्रध्दा व्यक्त होतात. वाचकांच्या मनात प्रखर राष्ट्रनिष्ठा निर्माण करण्याचे सामर्थ्य या गाथेत आहे.

श्री. गंगाधर विष्णू ठेकेदार उर्फ कवी केदार यांनी " स्वातंत्र्यवीरगाथा" हे सावरकरांच्या जीवनावर महाकाव्य लिहिले आहे. 12 सर्गात्मक या काव्यात सावरकरांविषयीचा कवीचा अभिमान पदोपदी जाणवतो. लहान वयात सुध्दा सावरकरांच्या ठायी असलेली प्रखर राष्ट्रनिष्ठा, "शठे शाठ्यम्" वृत्ती, निर्भिडता, क्षात्रतेज यांचे वर्णन करून कवीने "मुलाचे पाय पाळण्यात दिसतात" या म्हणीची सावरकरांच्या बाबतीतली सार्थकता स्पष्ट केली आहे. देशरक्षणासाठी धर्मरक्षणाची

आवश्यकता सावरकरांनी ओळखली होती. हिंदूंचे खिस्ती किंवा मुस्लीम धर्मांतर राष्ट्राला घातक आहे असे त्यांचे मत होते आणि राष्ट्रोत्कर्ष किंवा राष्ट्ररक्षणाच्या बाबतीत धर्माभिमान हा एक महत्त्वाचा घटक असतो. स्वधर्माचा अभिमान असणारे लोकच स्वधर्माचे पर्यायाने स्वराष्ट्राचे रक्षण करू शकतात. स्वधर्मप्रसारातूनच राष्ट्रसंवर्धन शक्य असते. कवीने सावरकरांना " राष्ट्राचा दीपस्तंभ " म्हणून सावरकरांचा गौरव केला आहे. कवीच्या मते राष्ट्रोत्कर्षासाठी भौतिक आणि आत्मिक सामर्थ्याच्या समन्वयाची गरज आहे. कवीने या महाकाव्यात सावरकरांची धर्माविषयीची जातीयतेविषयीची, अंधश्रध्देविषयीची मते देखील स्पस्ट केली आहेत. सर्वांच्या ठिकाणी एकच आत्मा आहे, हे जर मान्य केले तर स्पृश्य आणि अस्पृश्य सर्वांच्या ठिकाणी एकच परमात्मा असला पाहिजे, तर मग एकाचा आत्मा चांगला नि दुस-याचा विटाळ होतो हे कोणत्या तर्काच्या कसोटीवर मान्य करावयाचे? ही सारी परमेश्वराची लेकरे आहेत तर त्यांच्यामध्ये असा भेदभाव का ? असा सावरकरांचा सडेतोड प्रश्न होता. स्पृश्यास्पृष्य भेदभाव नाहिसे व्हावेत म्हणूनही त्यांनी प्रयत्न केले. राष्ट्रोध्दारासाठी, समाजोध्दारासाठी, समाजसुधारणेची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. कवीकेदारांनी सावरकरांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचे दर्शन या महाकाव्यामधून घडविलेले आहे. त्यांचे विचार राष्ट्रीय भावोत्तेजक आहेत.

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवनाचे दर्शन घडविणारे "श्रीगान्धिचरितम्" हे वासुदेवशास्त्री बागेवाडीकर यांनी छोटेसे गद्यचरित्र लिहले आहे. गांधीजींच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगाचे वर्णन अत्यंत सोप्या भाषेत श्री.बागेवाडीकरांनी केले आहे. त्यांच्या मनात गांधीजींच्या विषयी अत्यंत भक्तिभाव आहे. त्यांनी गांधीजींना परमेश्वराचा अवतार मानले आहे. "कंस वैगरे राक्षसांच्या त्रासातून प्रजेला मुक्त करण्यासाठी विष्णूंनी ज्याप्रमाणे कृष्णावतार घेतला त्याचप्रमाणे शस्त्राशिवाय दुष्ट राजांना पराभूत करणा-या "मोहन" चा भारतभूमीवर अवतार झाला." अशी कवीची श्रध्दा आहे. क्षमा, अहिंसा, शांतता व सत्याग्रह यांच्या साहाय्याने प्रबल साम्राज्यांना देखील जिंकता येते हे गांधीजींनी जगाला दाखवून दिले. निःशस्त्र, सविनय कायदेभंगाचे सामर्थ्य पटवून दिले. गांधीजींनी वर्णभेदाविरूध्द दिलेल्या लढयाचे, अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेल्या प्रयत्नांचे महत्त्व कवीने सांगितले आहे. या संपूर्ण चरित्रातून श्री.बागेवाडीकरांची गांधीवरील, त्यांच्या तत्त्वज्ञानावरीलनिष्ठा प्रकट होते.

"महात्मायनम्" या महाकाव्यात कवी केदार तथा गंगाधर विष्णू ठेकेदार यांनी 14 अध्यायामध्ये गांधीजींच्या समग्र जीवनाचे चित्रण केले आहे. गांधींच्या जन्मभूमीचे वर्णन करताना कवीने आदर्श गावाचे स्वरूपच वाचकांसमोर मांडलेले आहे. सर्वधर्मसमभाव, बंधुभाव, सत्य, सामंजस्य, संयम, शांततापूर्ण आचरण या गुणांचा गांधींना त्यांच्या जन्मभूमीकडूनच वारसा मिळाला होता असे कवीचे मत आहे. कवीची गांधींवरील श्रध्दा निर्विवाद आहे. परंतु तरीही गांधीहत्येनंतर "नथुरामाभियोग:" या अध्यायामध्ये नथुराम गोडसेने गांधींच्या हत्येची दिलेली कारणमीमांसा पाहिली म्हणजे कवीच्या मनात गांधीजींच्या

विषयी अंधश्रध्दा नाही हे स्पष्ट होते. गांधींच्या अतिमवाळ धोरणाया कवीने केलेला निषेध हे त्याचे प्रतीक आहे. कवीने वाचकांनाही अंतर्मुख केले आहे. "खरेच गांधींच्या अतिमवाळ धोरणामुळेच पाकिस्तान आणि भारत असे भारताचे दोन तुकडे झाले का? पाकिस्तानने भारतीयांवर निर्घृण अत्याचार केलेत का ? ते भारताच्या याच मवाळ धोरणामुळे केलेत का ? अंतर्मुख होऊन परीक्षण करण्यासारखे प्रश्न आहेत हे !

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर "सुभाषचरितम्" हे 10 सर्गाचे महाकाव्य श्री. विश्वनाथ छत्रे यांनी लिहिले आहे. तरूणांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा, जोम, आवेश, अन्यायाविरूध्द बंड पुकारण्याची वृत्ती, त्वेष निर्माण करणारे महाकाव्य आहे. युवकांच्या मनात राष्ट्राविषयी सद्भाव निर्माण करणे हा या काव्यलेखनामागचा कवीचा हेतू दिसून येतो. राष्ट्रीय अभिमानाने प्रेरित झालेली व्यक्ती कोणत्याही प्रकारचा त्याग करण्यास कचरत नाही, हे या महाकाव्यातून समजते. चांगल्या शिक्षणानेच देशाची चांगली सेवा करणे शक्य आहे हे कवीने पटवून दिले आहे. या काव्यातून सुभाषबाबूंचे राष्ट्रप्रेमी मन व्यक्त होते. त्यांचा राष्ट्राभिमान, राष्ट्रोध्दाराची, स्वातंत्र्याची तळमळ स्पष्ट होते. वाचकांच्या मनात सुभाषबाबू विषयी साहजिकच आदर वृध्दींगत होतो.

स्वतंत्र्य भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे चरित्र सांगणारे "जवाहरतरङ्गिणी" नावाचे शतककाव्य डॉ. वर्णेकरांनी लिहिले त्याला "भारतरत्नशतकम्" असेही नांव आहे. यामध्ये नेहरुंचे गुणवर्णन केलेले आहे. वर्णेकरांनी नेहरुंना भारताचा भाग्यविधाता, नवभारताचे शिल्पकार, विश्वशांतीचा पोषक, भारतीयप्रजातंत्ररुपी रथाचा सारथी, रत्नदीप असे संबोधून त्यांचा गौरव केला आहे. भारतीय संस्कृतीच्या विकासाची कामना प्रकट करुन आपली भारतनिष्ठा आणि नेहरुंवरील श्रध्दा वर्णेकरांनी व्यक्त केली आहे.

जवाहरचिन्तनम्" या काव्यामध्ये श्री. श्री. भि. वेलणकरांनी गेय गीतांमधून नेहरुंच्या जीवनाचे चित्र रेखाटले आहे. त्यामुळे या काव्याला नेहरुंच्या स्वदेशप्रेमपूर्ण, राष्ट्रीयभावनात्मक विचारांच्या संग्रहाचे रूप प्राप्त झाले आहे. नेहरुंचे जीवन म्हणजे मातृभूमीच्या असीम प्रेमाची परिणती आहे. मातृभूमी-वरील त्यांची ऐकांतिकनिष्ठा अतुल वैभव, उच्च विद्या किंवा सुंदर पत्नीचा सहवास देखील विचलीत करू शकली नाही. या काव्यातून कवीची नेहरु, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि राष्ट्रयांच्याविषयीची निष्ठा व्यक्त होते . वाचकांच्या मनामध्ये मातृभूमीविषयीचा अभिमान निर्माण करणारे भारतभूमीचे वर्णन कवीने केले आहे. भारतीय गणतंत्र राष्ट्राचा महिमा वर्णिला आहे. भारतीय संस्कृतीतील औदार्य व्यक्त केले आहे. मातृ-भूमीचा गौरव करून इथेच पुन्हा जन्म मिळावा अशी इच्छा व्यक्त केली आहे.

"महामन्त्री" या छोटयाशा गद्यचरित्रातून श्री. बागेवाडीकरांनी नेहरुंचा जीवनपट दाखविला आहे. नेहरुंच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचे वर्णन करून विद्यार्थ्यांच्या मनात नेहरुंविषयी श्रध्दा

जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रनिष्ठ,सर्वगुणसंपन्न आपले पंतप्रधान चिरायू होवोत अशी सदिच्छा व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र ही जशी शूरवीरांची भूमी आहे तशीच'संतांची पावनभूमीही आहे. समाजामध्ये ऐक्य आणि समभावाची वृत्ती,बंधुता निर्माण करण्यात संतांचा वाटा मोठा आहे. राष्ट्रोध्दाराच्या कार्यामध्ये शौर्याच्या बरोबरीने संतांच्या कार्याचे महत्त्व आहे. अशा संतांपैकी महाराष्ट्रात वीरांना उपयुक्त ठरलेल्या संतांच्या जीवनावरही संस्कृतमध्ये काव्ये लिहिली गेली. ज्यांच्या चरित्रामधून राष्ट्रीय चैतन्य, वृध्दिंगत होते अशा काव्यांमधील राष्ट्रीय विचारांचा परामर्श दुस-याच प्रकरणात " संतचरित्रे" या सदरात घेतला आहे. पंडिता क्षमा राव यांनी ज्ञानेश्वर,तुकाराम,रामदास यांची तर श्री.छत्रे यांनी एकनाथांचे चरित्र लिहिले आहे. या महाकाव्यांमधून प्रखर राष्ट्रीय विचार व्यक्त होत नसले तरी राष्ट्रीयत्वाची विश्वबंधुत्वाची,ऐक्याची,सामंजस्याची भावना समाजामध्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने या संतचरित्रांचा आणि संतसाहित्याचा महिमा अनन्य साधारण आहे. रामदास हे आर्त राष्ट्राचे उध्दारक आणि नव्या युगाचे प्रतिष्ठापक आहेत. स्वधर्म व स्वदेशाच्या उध्दारासाठी, स्वराज्यस्थापनेच्या कामी शिवरायांना सहाय्यक अशा रामदासांच्या जीवनाचे राष्ट्रीयभावोत्तेजक वर्णन पं.क्षमा राव यांनी "रामदासचरितम्" या महाकाव्यात केले आहे. राष्ट्ररक्षणासाठी,संवर्धनासाठी सांस्कृतिक आणि राजनैतिक ऐक्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. ज्ञान आणि बलोपासनेचा मंत्र देऊन समाजजागृती करणा-या रामदासांचे हे चरित्र निश्चितच प्रेरक आहे.

तुकारामचरितम्" या महाकाव्यातून तुकारामांच्या जनजागरणाच्या कार्याचा शिवरायांना झालेला उपयोग दाखविला आहे. तुकारामांनी शिवाजी महाराजांना स्वधर्माचरणाची करून दिलेली जाणीव क्षात्रधर्माचे सांगितलेले महत्त्व,राजाच्या कर्तव्याची करून दिलेली जाणीव वाचकांच्या मनात स्वधर्मनिष्ठा कर्तव्यनिष्ठा निर्माण करणारी आहे. "एकनाथ चरितम्" या महाकाव्यातश्री.छत्रे यांनी वर्णिलेली तत्कालीन राजकीय परिस्थिती,गुरू जनार्दनांनी अध्यात्मज्ञानाव्यतिरिक्त राजनीतीच्या डावपेचांचे दिलेले शिक्षण या सर्वच वर्णनातून कवीची मातृभूनिष्ठा गुरुनिष्ठा आणि एकनाथांवरील श्रध्दा व्यक्त होते. कवीच्या मते राष्ट्राची दृढता अंतर्गत रचनेवर आणि चरित्रांवर आधारलेली असते. राष्ट्रांतर्गत सामाजिक,धार्मिक दोष नाहीसे करणे हे आवश्यक आहे. या सर्वच संतचरित्रांमधून पं.क्षमा राव आणि श्री.छत्रे यांची संतांविषयीची श्रध्दा , भक्ती तर दिसतेच परंतु स्वधर्म आणि स्वराष्ट्राभिमानही प्रकट होतो. महाराष्ट्रावरच नव्हे,तर भारतावरही या संतांचे अनंत उपकार आहेत.

"मन्दोर्मिमाला" या शतककाव्यात विभूतिवंदना स्तोत्रम् या काव्यातून श्री.वर्णेकरांची विभूतिपूजेची वृत्ती प्रकट होते. भारतातील संत, राष्ट्रपुरूष; ऋषी, महात्मे, कवी, राजे, धर्मसंस्थापक, क्रांतिकारक, देशसेवक हुतात्मे ,पूजनीय महिला यांच्या विषयीची कवींची निष्ठा, श्रध्दा प्रकटते. एकंदरीत या सर्वच विभूतिकाव्यांमधून सर्वच कवींची आपल्या देशातील राष्ट्रनायक, संत यांच्याविषयी श्रध्दा तर व्यक्त होतेच, शिवाय आपल्या मातृभूमीबद्दलचे त्यांचे प्रेम, देशाभिमान, स्वातंत्र्याविषयीचे विचार, राष्ट्रोत्कर्षाची तळमळ, समाजसुधारणेची आस प्रकर्षाने जाणवते. तिस-या प्रकरणात भारतीय स्वातंत्र्ये ति-हासपर आणि तत्त्वदर्शनपर काव्यांचा आस्वाद घेतलेला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कोणी कोणी कसे कसे प्रयत्न केले त्याचा इतिहास सांगणा-या काव्यांमधून देखील त्या त्या कवींची राष्ट्रनिष्ठा व्यक्त झालेली आहे. 1962 साली चीनने भारतावर आक्रमण केले या पार्श्वभूमीवर येन केन प्रकारेण स्वसुखात मग्न आणा-या भारतीयांना जागृत करण्याच्या उद्देशाने श्री कृ.वा.चितळे यांनी स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणा-या देशभक्तांच्या, क्रांतिकारकांच्या कार्याचे वर्णन करणारा "भारतस्वातंत्र्यम्" हा स्वातंत्र्येतिहास सांगणारा गद्यग्रंथ लिहिला. स्वातंत्र्यासाठी आमच्या पूर्वजांनी कोणते मूल्य देऊन स्वातंत्र्य मिळविले हे परकीय आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर लोकांना सांगून स्वातंत्र्य रक्षणासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य या ग्रंथाने केले आहे. भारताच्या भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक उच्च परंपरांचे वर्णन करून लेखकाने आपली निष्ठा व्यक्त केली आहे. याशिवाय स्वतंत्र भारताची राजमुद्रा, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि वन्देमातरम् गीत यांचे राष्ट्रीयभावोत्तेजक वर्णन केले आहे. लेखकाच्या मते ही सर्व भारताची सन्मान चिन्हे आहेत.

"स्वःराज्यविजयः" हे पं.क्षमा राव यांनी 45 सर्गांचे महाकाव्य लिहिले आहे. भारतीय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्याच्या हेतूने या काव्यामध्ये एक आचारसंहिता सांगितली आहे. आपल्या राष्ट्राविषयीचे दायित्व पूर्ण करण्याबाबत मागेपुढे पाहू नये हा संदेश या काव्यातून दिला आहे. मानवी मूल्यांच्या स्थापनेसाठी क्षमा राव यांचे साहित्य निर्माण झालेले दिसून येते. स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील कालखंडाचे जाज्वल्यमान वर्णन कवयित्रीने या महाकाव्यात केले आहे.

श्री विश्वनाथ छत्रे यांनी "भारतीय स्वातन्त्र्योदयः"हे इ.स.1857 ते 1948 पर्यंतच्या कालखंडात घडलेल्या प्रसंगाचे वर्णन करणारे महाकाव्य लिहिले आहे. 1857 च्या क्रांतियुध्दातील क्रांतिकारक लो.टिळक, म.गांधी, नेताजी सुभाष आणि इतर क्रांतिकारकांच्या कार्याचा आढावा घेऊन स्वातंत्र्ययज्ञात आहुती दिलेल्या सर्वज्ञात आणि अज्ञात हुतात्म्यांचे श्रध्दापूर्वक स्मरण करून त्यांना आदरांजली वाहून

त्यांच्याविषयी कवीने कृतज्ञता प्रकट केली आहे.

श्री.वासुदेवशास्त्री बागेवाडीकरांनी 1857 च्या क्रांतीवर " क्रांतियुध्दम्" हे गद्यकाव्य लिहिले आहे. पारतंत्र्यरूपी सुवर्ण पिंज-यापेक्षा स्वातंत्र्यरूपी पर्णकुटी श्रेष्ठ असल्याचा विचार कवीने मांडला आहे.स्वातंत्र्ययुध्दामध्ये आहुती दिलेल्यांचे स्मरण सर्व देशवासियांना पुण्यप्रद आहे.प्रेरक आहे. उत्साहवर्धक आहे. स्वातंत्र्यरणयज्ञामध्ये स्वप्राणांची आहुती दिलेल्या वीरपुरूषांचे गुणसंकीर्तन करण्यासाठी श्री.बागेवाडीकरांनी हा इतिहास लिहिला आहे.

या सर्वच काव्यामधून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी पूर्वजांनी केलेल्या त्यागाचे,बलिदानाचे वर्णन करून कवींनी स्वातंत्र्यरक्षणाच्या,राष्ट्रोत्कर्षाच्या जबाबदारीची जाणीव भारतीयांना करून दिली आहे. भारतीय स्वातंत्र्येतिहासाची सांगता स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे होते. राज्यघटनेचा संस्कृतानुवाद ही त्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण बाब आहे. म्हणून या प्रकरणाच्या शेवटी राज्यघटनेच्या संस्कृता-नुवादाविषयी थोडे विवेचन केले आहे. या गोष्टीचे महत्त्व असे की या समितीमध्ये बरेचसे सभासद महाराष्ट्रातील आहेत. ही घटना महाराष्ट्रातील वाई येथे मुद्रित करण्यात आली.

या प्रकरणात गांधींच्या अहिंसा,सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग या तत्त्वांचा पुरस्कार करणा-या काव्यांचा विचार केलेला आहे. गांधींच्या विचारांचा केवळ भारतावरच नव्हे तर संपूर्ण जगावर प्रभाव पडलेला होता. भगवद्गीतेच्या अनुकरणाचे "गान्धिगीता" हे काव्य श्री.श्रीनिवास ताडपत्रीकरांनी लिहिले. यामध्ये गांधींच्या राजनैतिक तत्त्वप्रणालीचा पुरस्कार कवीने केला आहे. यामध्ये सांगितलेली आचरणसंहिता जरी स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकांसाठी गांधींनी सांगितली होती ती आजही भारतीयांना आचरणीय आहे. देशाला परकीयांच्या आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सध्या कांही युवकांनी फक्त स्वदेशीच्या स्वीकार करण्याचे तंत्र पुन्हा एकदा आचरणात सुरवात केली आहे. भारतीय जनतेच्या मनात आत्म-गौरवाची भावना,येथील नैसर्गिक संपत्तीचा अभिमान कवीने निर्माण केला आहे.

"अपूर्वः शान्ति संग्रामः" ही एकांकिका श्री.छत्रे यांनी गांधींच्या दांडीयात्रा प्रसंगावर लिहिली आहे. सर्वसामान्य लोक देखील सविनय कायदेभंग,सत्याग्रह आणि शांततापूर्ण लढ्याने किती भारावून गेले होते.ते यातून स्पष्ट होते.

डॉ.श्री.वर्णेकर यांनी श्रमाचे माहात्म्य सांगणारी "श्रमगीता" लिहिली आहे. श्रम हाच भारताच्या सर्वांगीण प्रगतीचा मूलमंत्र त्यांनी सांगितला आहे. गांधींच्या स्वावलंबन आणि श्रमनिष्ठेचा पुरस्कार कवीने केलेला आहे. राष्ट्रोत्कर्षासाठी एकजुटीने श्रमपूजा करण्याची आवश्यकता कवीने प्रतिपादन केलेली आहे.

"उत्तरसत्याग्रहगीता" या महाकाव्यात पं.क्षमा राव यांनी गांधींच्या सत्याग्रहलढ्याचे महत्त्व विशद केले आहे. यामध्ये भारतीय राष्ट्रीय जीवनाचेही चित्रण केलेले आहे

या सर्वच कवींची गांधीवरील श्रध्दा,त्यांच्या तत्त्वज्ञानावरील निष्ठा प्रकट होते. गांधींच्या सत्य, अहिंसा,असहकार आणि स्वावलंबन या तत्त्वांचा जनतेवर असलेला प्रभाव जाणवतो.

चौथ्या प्रकरणांत संस्कृत भाषेचे प्राचीन वैभव राजभाषा म्हणून एकेकाळी तिला असलेले मानाचे स्थान आणि आज झालेली तिची दयनीय अवस्था वर्णन करणा-या काव्यांचा तसेच आधुनिक संस्कृत भाषाशैलीवर इतर भाषांचा परिणाम यांचा समावेश आहे. संस्कृतची दयनीय अवस्था नाहीशी करून तिला पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी करावयाची उपाययोजना ,संस्कृत भाषेचा प्रसार करण्यासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची माहिती सांगणारी,संस्कृतचे महत्त्व विशद करणारी काव्ये या प्रकरणात समाविष्ट आहेत.यामध्ये डॉ.वर्णेकरांचे "प्रश्नावलीविमर्शः" हे महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. संस्कृतभाषेच्या प्रचारार्थ भारतसरकारने विचारलेल्या तेहेतीस प्रश्नांची उत्तरे यांत आहेत. यामधून श्री.वर्णेकरांची संस्कृतनिष्ठा आणि राष्ट्र-प्रेमही प्रकट होते. त्यांच्यामते भारतीयांच्यात राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी संस्कृती आणि संस्कृती-साठी संस्कृतभाषेची आवड निर्माण होणे आवश्यक आहे. आपले राष्ट्र,राष्ट्रीयता आणि राष्ट्रीयभावना यांच्या रक्षणासाठी,संवर्धनासाठी संस्कृत भाषेच्या अध्ययनाची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

डॉ.पळसुले यांनी "समानमस्तु वो मनः" या नाटकात एकाच राष्ट्रभाषेचे महत्त्व सांगितले आहे. प्रादेशिक भाषांची जननी संस्कृत हीच राष्ट्रभाषा होण्यास सर्वथा योग्य आहे.

"किमर्थं संस्कृतम् ?" या पुस्तकात संस्कृतचे महत्त्व,तिची आवश्यकता,तिच्या प्रसारार्थ करावयाचे प्रयत्न यावर चर्चा आहे. "संस्कृत भाषा" या काव्यसंग्रहातही श्री वेलणकरांनी संस्कृतचा गौरव करणा-या कविता लिहिल्या आहेत. "भ्रांतभारतम्" या नाटकात आधुनिकतेच्या नावावर भरकटलेल्या भारताची अवस्था वर्णिली आहे. राष्ट्रोध्दारासाठी संस्कृतचा स्वीकार अपरिहार्य आहे. असे मत मांडलेले आहे.

एकंदरीतच संस्कृतचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तिच्यातील ज्ञानठेवा अमोल आहे. या ज्ञानभांडाराचे प्रत्यंतर विदेशी लोकांना देखील आले. परदेशांमध्ये संस्कृतचे अध्ययन लोक आवडीने करतात. संस्कृत ही संगणकासाठीही अत्यंत उपयुक्त भाषा असल्याचे विचार मांडले जात आहेत.आपल्या देशाचा इतिहास,संस्कृती,ज्ञान ज्या संस्कृतमध्ये आहे. त्या संस्कृतचा प्रसार होणे राष्ट्रीय ऐक्य,राष्ट्राभिमानाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये निर्माण झालेल्या संस्कृत साहित्याच्या भाषाशैलीचा विचारही चौथ्या प्रकरणात केलेला आहे. अर्वाचीन काळातील संस्कृतवर इंग्रजी आणि उर्दू भाषांचा झालेला परिणाम महत्त्वपूर्ण आहे. परिवर्तनशीलता हे जिवंत भाषेचे वैशिष्टय आहे. संस्कृत भाषेत पडणा-या नवीन शब्दांची भर व तिच्यातील परिवर्तन हे तिच्या जिवंतपणाचेच लक्षण आहे. त्यामुळे संस्कृत ही मृत भाषा नाही हे आपोआपच सिध्द होते.

पाचव्या संकीर्ण या प्रकरणांत मातृभूमीचे वर्णन करणारी काव्ये आहेत.यामध्ये डॉ. वर्णेकरांची "मातृभूलहरी" आणि "मन्देर्मिमाला" ही दोन शतककाव्ये आहेत.वाचकांच्या मनात मातृभूमी-विषयी प्रेम,आदर व श्रध्दा निर्माण करण्याच्या हेतूने कवीने या काव्यांचीनिर्मिती केली आहे. मतृभूमीचे मानवीकरण करुन तिचे हृदय वर्णन कवीने केलेले आहे. धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष" या पुरुषार्थांची प्राप्ती करुन देणारी कल्पलता असे मातृभूमीला म्हटले आहे. भारताचे प्राकृतिक,धार्मिक,सांस्कृतिक वर्णन करुन मातृभूमीचे स्तवन करुन तिचा जयजयकार केला आहे. कवीची मातृभूमी बददलची निष्ठा या काव्यातून प्रकट होते.

याचप्रकरणात स्फुटकाव्ये,लेख,आकाशवाणीवर सादर झालेली रुपके समावेश केला आहे. संस्कृत नियतकालिकांमधून वेळोवेळी प्रसिध्द झालेल्या साहित्यातून देखील त्या त्या कवींची राष्ट्रीयभावना दृष्टोत्पत्तीस येते. शारदा,गुंजारव,संविद,गीर्वाणसुध्दा अशा अनेक संस्कृत नियतकालिकांमधून भारत-भूमीचे वर्णन करणारी,श्रध्दांजली अर्पण करणारी,महाराष्ट्राचे वर्णन करणारी, स्वराज्याचे महत्त्व विशद करणारी,संस्कृत भाषेच्या माहात्म्याविषयीची अनेक काव्ये प्रसिध्द होतात. या सर्वांमधून राष्ट्रीय विचार प्रकट होतात. वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा,राष्ट्रीयभावना वृध्दिंगत करण्यात नियतकालिकांचा,आकाशवाणी-वरील रुपकांचा महत्त्वाचा वाटा आहे. श्री.वेलणकरांची कालिंदी,कैलासकम्प:,स्वातंत्र्यलक्ष्मी:,हुतात्मा-दधीचि: ,राज्ञी दुर्गावती,स्वातन्त्र्यचिन्ता,स्वातन्त्र्यमणि: या रुपकांमधून व्यक्त होणा-या राष्ट्रीय भावनांचा विचार "संकीर्ण" याच प्रकरणांत केला आहे.

एकंदरीत या सर्वच साहित्याच्या अभ्यासावरुन आपण असे ठामपणे म्हणू शकतो की ऋग्वेद काळापासून आजतागायत संस्कृतमध्ये राष्ट्रवादी साहित्याची भरपूर प्रमाणात निर्मिती झाली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तर अशा साहित्याची खूपच निर्मिती झाली आहे. आणि याबाबतीत भारतातील इतर प्रांतीयांप्रमाणेच महाराष्ट्रातील कवी देखील कधीच मागे राहिले नाहीत. या अनुषंगानेच "राष्ट्रीय विचारसरणी आमच्यामध्ये पाश्चात्यांच्या अनुकरणातून आली" हा जो कांही लोकांचा चुकीचा ग्रह आहे. तो पुसुन काढण्याचा मी यथामती प्रयत्न केला आहे. संस्कृत साहित्य हे राष्ट्रीय विचारसरणीत कधीच मागे राहिलेले नाही हे या लघुशोधनिबंधावरुन सिध्द होते.